# बा भिमाच्या कविता

## (प्रातिनिधिक काव्यसंग्रह)





काव्यांगण प्रकाशन
महाराष्ट्र

# ...अर्पण...



डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, आणि
कवी, लेखक, वक्ता, काव्यप्रेमी, साहित्य वाचक वर्ग,
सामान्य जनता यांना हा पहिला काव्यपुष्प
आदराने अर्पण करीत आहोत.



**संपादक**

**श्री. राजू पाडेकर  सौ. प्रांजली काळबेंडे  श्री. नीरज आत्राम**

या पुस्तकातील कविता काव्यांगण साहित्य मंच या संस्थेतील कवींनी रचलेल्या असून त्यांनी स्थापन केलेल्या काव्यांगण प्रकाशनातर्फे या प्रसिद्ध केल्या आहेत. या पुस्तकाच्या संपादक व प्रकाशकांच्या वतीने मा. श्री राजू पाडेकर यांनी या पुस्तकाच्या विनामूल्य ई वितरणाची परवानगी दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान त्यांचे मनःपूर्वक आभार मानते.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण त्या त्या कवीना त्यांनी पुस्तकात दिलेल्या क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

या पुस्तकातील कवितांचे सर्व हक्क त्या त्या कवींकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी संस्थेची व कवींची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

जयभीम.....!

काव्यांगण प्रकाशन प्रकाशित पहिला काव्यसंग्रह 'बा भीमाच्या कविता ...'सर्व वाचकांच्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे,हायसे वाटत आहे.विश्ववंदनिय डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आदरांजली वाहून काव्यांगण प्रकाशन ची सुरुवात होत आहे. अनेक दिवसांचे स्वप्न सत्यात अवतरले आहे.

हे स्वप्न साकारण्यासाठी आम्हाला एकूण ४५ कवी/कवयित्रींची साथ लाभल्याने हा संग्रह अतिशय दर्जेदार झालेला आहे.अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेल्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राचा अभ्यास करून प्रत्येक लेखणीने त्यांच्या विचारांना अभिवादन केलेले आहे.

त्यांच्या प्रती असलेल्या सद्भावना,आदर, अभिमान... सर्व काही या संग्रहात पाहावयास मिळणार आहे..

ज्ञानज्योती विचारांच्या, प्रज्वलित करून मन
प्रत्येक ओळीत कवींच्या,बा भिमांना अभिवादन...

**संपादक**

**श्री. राजू पाडेकर     सौ. प्रांजली काळबेंडे     श्री. नीरज आत्राम**

# शुभेच्छा

'बा भिमाच्या कविता' हा विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,यांच्या जीवनकार्यावर वाहिलेल्या या देखण्या कवितासंग्रहाला शुभेच्छा देताना मला अत्यंत आनंद होत आहे. साहित्य हे समाजाचा आरसा असते. समाज साहित्याच्या माध्यमातून भूत वर्तमान आणि भविष्याची सांगड घालत असतो. भूतकाळातील चूकापासून बोध घेऊन वर्तमानाच्या मदतीने आपल्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करत असतो. क्रांतिसुर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा तेच केले. वाचा नसणार्या सर्वसामान्य दलीत,पीडितांना आपल्या धारदार लेखनीतून

तत्कालीन समाजातील अन्याय, अत्याचार आणि विषमतेवर आसूड ओढून समतेच्या लेखनीने संविधान लीहून मानव कल्याणाचे महान कार्य केले.

हा कवितासंग्रह म्हणजे महामानवाला वाहिलेली शब्दांजली आहे. या कवितासंग्रहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून बाबासाहेबांच्या शूर सैनिकांनी आपल्या कवितांम धून समतेच्या मुल्ल्यांची पुनर्स्थापना करण्याचे काम केले आहे. ही गोष्ट निश्चितच अभिमानास्पद आहे. या कार्याला माझा थोडासा का होईना हातभार लागला हे मी माझे भाग्य समजतो.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना कोटी कोटी अभिनंदन करून या कवितासंग्रहाला माझ्या शुभेच्छा..!

**धनंजय साळवे,**

**गट विकास अधिकारी,गडचिरोली.**

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान निर्माते,स्वातंत्र्य समता,बंधूता,न्याय आणि एकूणच तत्वज्ञानाचे मानंबिदू आहेत. या भारतात विविध धर्म जाती असून सुद्धा भारत एकसंघ आहे.भारताची लोकशाही आणि संविधान जबरदस्त आहे.संविधानामूळे भारत एकात्म आहे,ही देण या भारताला लाभली त्या श्रेयाचे अग्र मानकरी हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरच आहेत हे त्रिकालबाधीत सत्य आहे. बुद्ध,कबिर ,फुले यांच्या तत्वज्ञानाने प्रेरित झालेले ते एक सर्वोच्च महान युगनायक होत,नव्हे आहेत तर हे सर्व नमूद करायच कारण असं की आंबेडकरी साहित्य आंबेडकरी कविता,लेख,नाटक,

कांदबरी,पथनाट्य,आत्मचरित्र सर्व आंबेडकरी तत्वज्ञानाचे पाईक आहेत.आंबेडकरी साहित्यात मानवाच्या विकासाचे आणि एकूणच मानवाच्या सर्वहारा बाबीचे साहित्य आहे ते मग समाज किंवा धर्म जात पाहत नाही ते तमाम मानवी विकास प्रक्रियेचे पर्वत फोडून एक नवी वाट तयार करते,तर बा ! भिमाच्या कविता या नावाने एक काव्यसंग्रह आहे.तो खर म्हणजे एक प्रातिनिधीक स्वरुपाचा आहे. महाराष्ट्रातील प्रतिथयश कवी म्हणून जे काव्य करतात ते खरच कुठेतरी आपल्यात आंबेडकरी कविता असावी अस त्यांना वाटते तर मग स्वतंत्र्य काव्यसंग्रह काढणे ही खुपच खर्चिक बाब आहे. हे ही तेवढेच महत्वाचे आहे.काव्यांगण साहित्य मंच तथा बहूऊद्देशिय संस्था,अहमदनगर यांचे सयुक्त विद्यमाने हा प्रातिनिधीक काव्य संग्रह दमदार वैचारिकता घेवून येत आहे याचे मोठे कौतूकच व्हायला पाहिजे आंबेडकरी कविता काव्य संग्रह खुप आहेत.

मात्र आता निखळ  कविताअसलेला कविता संग्रह ‘बा ! भिमाच्या कविता ‘च आहेत. बा भिमाच्या यशोगाथांचे यथोचित निरुपण आहे. सर्वहारा लढे आहेत तमाम वंचित पिडीतांना अंधार यात्रेतून प्रकाश यात्रेत आणून त्यांचा विझलेला दिवा पुन्हा प्रकाश

मान केला आहे,तर असेच सर्व कविवर्य या संग्रहातील तुफानाचे दिवे आहेत. एकूण पंचेचाळीस कविता या संग्रहात आहेत या काव्यासंग्रहच्या प्रकाशनाची ,आणि संपादनाची जबाबदारी घेणारे महानुभावी मा.राजू पाडेकर,मा.प्रांजली काळबेंडे,प्रा.नीरज आत्राम हे त्रिरत्न आहेत.यांच्या पुढाकाराने हा बा!भिमाच्या कविता कवितासंग्रह नावरुपास येतोय ही खुप मोठी कवितेतील समतेची नांदी आहे.हा संग्रह महाराष्ट्रातील घराघरात वाचल्या जावो! आणि तो जाईल असा आशावाद मला आहे. या संग्रहाला ज्यांनी ज्यांनी कविता पाठवून आंबेडकरी कवितेची पाठराखण केली त्या सर्व कविवर्याचे मी हार्दिक अभिनंदन करतो.तसेच मी संपादकीय त्रिरत्नांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करतो व पुढील वाटचालीसाठी मंगलमय सदिच्छासह,असा हा माझा संक्षिप्त शुभेच्छाचा प्रपंच.



**जेष्ठ कवी,साहित्यिक,**

**शिवा प्रधान,**

**विभागीय अध्यक्ष अमरावती विभाग,**

**अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद,पुणे**

**मो.नं. ७०५७६०५९६८**

# अं|त|रं|ग


१) विश्व वंदनीय बाबा ------------------- सौ. दुर्गा डांगे, हिंगोली /०८

२) ज्ञानसूर्य --------------- सौ. प्रतिमा काळे, पुणे / १०

३) विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ------- सौ. शुभांगी जाधव, पुणे / ११

४) भिमराया ------------- सुनंदा पाटील, नाशिक / १२

५) भीम गाथा -------- सीमा तायडे / १३

६) विश्वरत्न भारतीय संविधान ----- संदीप जंगम, कोल्हापूर / १४

७) तरुणांनो जागृक व्हा. ------ सुरेखा काळे, सोलापूर / १५

८) महामानव ---------- सौ. हर्षदा गुळमिरे, सांगोला / १६

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर----------- भरत कांबळे, लातूर / १७

१०) संविधान-------- सौ. सुवर्णा तेली, सांगोला १८

११) आपल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांची जयंती -- विलास देवळेकर / १९

१२) युद्ध नको बुद्ध हवा ----- प्रतिभा खसाळे, यवतमाळ / २०

१३) संवेदना संविधानाच्या ----- सुमती टापसे, नाशिक / २१

१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ----- सौ. तेजस्विनी लोखंडे / २२

१५) भिमाच्या पेनाची शाई बनली रमाई - सौ. प्रतिभा कळंब / २३

१६) आधार ------- वैशाली जगताप / बोरसे, धुळे / २४

१७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर --- सौ. अंजली देशपांडे, नाशिक / २५

१८) महामानवाची गौरव गाथा - जयद्रथ आखाडे, पुणे / २६

१९) माझा भिमराया ----- गीता शिंदे पाटील, धाराशिव / २७

२०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ---- प्रदीप कोहपरे, चंद्रपूर / २८

२१) घटना शिल्पकार ------ सौ. अनुराधा पाठक, पुणे / २९

२२) भीमा तुझे योगदान ----- अशोक मांदाडे, गडचिरोली / ३०

२३) साऱ्या जगात आहे थोरं ---- मंजूताईराजे जाधव, बुलढाणा / ३१

२४) महामानव ------ दर्शन जोशी, संगमनेर / ३२

# अं|त|रं|ग


२५) संदेश ------ प्रल्हाद घोरबांड ( गुरुजी ), नांदेड / ३३

२६) बाबासाहेबांमुळे ------- दीपककुमार सरदार, बुलढाणा / ३४

२७) भिम झाला माझा विश्वरत्न -- माणिक गोडसे, नाशिक / ३५

२८) प्रज्ञा सूर्य मानवतेचा ----- प्रा. डॉ. मीना सुर्वे, सांगली / ३६

२९) कैवारी बहुजनांचे ---- विनोद सोनवणे लंघानेकर, अमळनेर / ३८

३०) आम्ही ----------- रजनी निकाळजे, मुंबई / ३९

३१) भारतरत्न घटनेचे शिल्पकार -- राजश्री वाणी, पुणे / ४०

३२) तेजसूर्य चमकला ---- सचिन पाटील, रायगड / ४१

३३) भारतीय संविधान ---- देविदास हनवते, नागपूर / ४२

३४) विश्वरत्न ---------- धर्मेंद्र कन्नाचे, चंद्रपूर / ४३

३५) भिम - क्रांती ------ अभिजित ठमके, चंद्रपूर / ४४

३६) सारथी मी होणार आहे. --- अभिजित ठमके, चंद्रपूर / ४५

३७) बाबा - सौ. रजनी पोयाम, यवतमाळ / ४६

३८) क्रांतीसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर ---- मधुकर दुफारे, चंद्रपूर / ४७

३९) संविधान - नरेंद्र कन्नाके, चंद्रपूर / ४८

४०) महामानव बाबासाहेब --- बी. जी. कळसे, नांदेड / ४९

४१) महामानव -- डॉ. प्रवीण किलनाके, गडचिरोली / ५०

४२) विश्वरत्न --- सौ. सुचिता कुनघटकर, नागपूर / ५१

४३) उपकार बा भीमा तुझे...! --- भीमानंद मेश्राम, ब्रह्मपुरी / ५२

४४) देणं --- उमा गजभिये, गोंदिया / ५३

४५) भिमा तुमच्यामूळे....--- शेषराव जाधव, नांदेड / ५४

४५) नमन तुम्हाला बाबासाहेब --- सचिन गणपतराव मुळे / ५५

४७) युगपुरुष --- पौर्णिमा सुरज डांगे / ५६

४८) नतमस्तक ---- प्रभावती संदिप वळवले / ५७

४९) भीम माझा --- अनिल शामराव केंगार / ५८



# विश्ववंदनिय बाबा

**सौ. दुर्गा संतोष डांगे (वसमत, जि.हिंगोली. - ९३७३८९३२२१)**

विश्ववंदनिय बाबा
तुमच्या मुळेच आज
समाजातील तळागाळातील
लोकांपर्यंत शिक्षण पोहचलय आज...

गावकुसाबाहेर राहणारा समाज...
सर्वत्र सन्मानाने
फिरतोय आज...



शिका संघटित व्हा
आणि संघर्ष करा...
ह्या संदेशाने प्रेरित होऊन
प्रगती झाली थराथरात....

रमाई च्या त्यागात
अनब बाबांच्या कष्टातून...
 आलयं फुलं
आत्मसन्मानाच आज फुलून...

संविधानान तुमच्या
शिकवलाय धडा
समानतेचा अनब मानवतेचा...
अनब घालून दिली देशाला सांगड
समता आणि बंधुतेची...

आम्ही भारताचे नागरिक
स्त्री-पुरूष समानता
आणि मानवता
शिकवली आम्हाला

कायदा काय असतो?
ते पटवून दिले...
समानतेच्या मार्गाने
सर्वांना समान हक्क मिळवून दिले...



# ज्ञानसूर्य

सौ.प्रतिमा अरुण काळे (निगडी प्राधिकरण पुणे,४४ - ८८३०६५४६६१)

पोटी भिमाई जन्मला
रामजीचा पुत्र थोर
संघर्षाच्या जीवनात
हाती विचारांचा दोर...१

तळपता ज्वालामुखी
समानता तत्त्वावर
रेखाटले संविधान
निष्ठा त्यांची कार्यावर...२



जेव्हा फोफाळला क्रूर
वर्णभेद,लिंगभेद
झुगारून लेखणीने
दूर केला जातीभेद..३

समाजाच्या प्रगतीस
हाती घेतली लेखणी
शांतीप्रिय मार्गे धावे
शोभे लाखात देखणी...४

एकनिष्ठ,बोधिसत्व
प्रज्ञासूर्य,ज्ञानसूर्य
एकात्मता जपणारे
भारताचे क्रांतिसूर्य...५



# विश्वरत्न :डॉ बाबासाहेब आंबेडकर

सौ.शुभांगी गणेश जाधव (पुणे - ९६६५१०५१७२)

मध्यप्रदेशातील महू गावी ज्ञानसूर्य जन्मले
दलित,अस्पृश्य लोकांचे कैवारी जाहले

पिता रामजी माता भीमाबाईचे चौदावे रत्न
उच्चशिक्षण घेऊन बनले थोर अर्थशास्त्रज्ञ

दीनदलित अस्पृश्यांचे दु:ख जवळून जाणले
हिंदुधर्म त्याग करून बौद्ध धर्मास स्विकारले

शिल्पकार राज्यघटनेचे उपेक्षितांचे उद्धारक
कायदेपंडित,विश्वरत्न, बौद्धधर्माचे प्रसारक

उच्चविभूषित,थोर कायदेपंडित जाहले
अभिमान बनून भीमराव देशाचे भारतरत्न बनले

वाचनाची प्रचंड आवड मनी हाच ध्यास
मनु:स्मृतीचे केले दहन मार्ग दाखवला दलितांस

शिका,संघटित व्हा,संघर्ष करा मूलमंत्र दिला
महामानव बनूनी ज्ञानसूर्य तेजाने तळपला

स्पर्शाने त्यांच्या पावन झाले आपले संविधान
युगप्रवर्तक,विश्वरत्न डॉ.आंबेडकर असे महान



# भिमराया (डॉ.बाबासाहेब आंबेडकर)

**सुनंदा पाटील, नाशिक**

भिमराया तुम्ही दिले आम्हाला शिक्षण, कर्तृत्वाचे ज्ञान
तुमच्या मुळेच आम्ही घडलो, ज्ञानवान
आई भिमाबाई अन बाप रामजी, पोटी जन्मला हिरा
काळोखातला जीवनातला एक प्रकाशाचा तेजस्वी तारा
विचारधारा शिवबा,ज्योतीबा अन गौतम बुद्धांची
खर्चिले सारे जीवन संघर्षांत झुंजूनी
लाभली साथ धीरगंभीर रमाईची, फळा आली पुण्याई मातापित्याची
कष्टात अध्ययन, चिंतनात ध्यान, १पावाचा तुकडा अन कपभर चहा.
१८-१८तास अभ्यासात झोकून झालेत तुम्ही महान
मिळाली शिष्यवृत्ती,अन परदेशी प्रयाण, अव्वलतेतून विसरून भूक अन तहान
विविध पदव्या,बॅरिस्टर, अर्थशास्त्रज्ञ, तत्वज्ञ प्रबंधक, समाजसेवक सर्वच तुमच्या ठायी
जपले शाहू विचार, भारत रत्न तुम्ही,आमचे शिश नेहमीच तुमच्या पायी
दिली राज्यघटना,लिहीले संविधान,नांव भारतवर्षांत
तुमच्या कर्तृत्वाचा डंका वाजतो जगभर
अजोड कर्तृत्वाने, जनमानसात अजरामर,अजरामर



# भीमगाथा

सीमा कृष्णकांत तायडे (मालाड,मुंबई - मो.९९६७२८६८०८)

माझ्या बाबांची थोरवी
किती वर्णावी सांगावी,
त्यांच्यामुळे लाभली
नवजीवन पालवी.

होता सर्वत्र अंधार
ज्ञानरूपी दीप दिला,
भाग्य उजळून आले
धम्म हा शिकविला.

शिक्षणाचा पुरस्कार
दिला समतेचा मंत्र
संविधान हे लिहून
जगा दिले नवे तंत्र.

खुले केले चवदार
चव आणली पाण्यास,
दिले हक्काचे जगणे
अर्थ आला जगण्यास.

माझ्या भिमाची थोरवी
कशी वर्णू भीमगाथा,
पडे थिटी हो लेखणी
गाथा तुझी गाता गाता.





# विश्वरत्न भारतीय संविधान

**संदिप शिवाजी जंगम (कोल्हापूर - ७०८३७३२०२०)**

साधण्या सामाजिक, आर्थिक न्याय
मिळाले आपणांस भारतीय संविधान
साऱ्यांनाच दिधला समानतेचा सन्मान
विचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे हे गुणगान..॥

शिक्षण, नोकरी साऱ्या क्षेत्रात संधी समान
माय भगिनींसाठी संविधान ठरले वरदान
न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुतेची जाण
वागण्या, बोलण्याचा धडा तो छान..॥

यशवंत,गुणवंत, कीर्तिवंत होण्या शिक्षण
जीवित, व्यक्तिगत स्वातंत्र्याबाबत संरक्षण
अपराधी गुन्हेगारास मात्र कडक शासन
करू सारे या तेजपुंज विचारांचे जागरण..॥

जातीभेद विसरुनी करू संस्कृतीचे जतन
हिच देते संविधान आपणांस शिकवण
करू शाहू, फुले, आंबेडकर यांना नमन
एकता, अखंडता जपू आपण सर्वजण..॥

बावीस भाग, तीनशे पंच्यान्नव अनुच्छेदातून
२६ नोव्हेंबर १९४९ ला लिहिले सुवर्णपान
लेखणीत बंदिस्त केले भीमराव ते महान
सर्वश्रेष्ठ उपाधी दिधली तयांस भारतरत्न..॥



म्हणती विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांस..

# तरूणांनी जागरुक व्हावं

कवयित्री सौ सुरेखाताई काळे (कोरेगाव, सोलापूर - ९७६३९०२६३०)

शोभुन दिसतेय बाबांची मुर्ती
हातात संविधान...
भीमाच्या नावा संगं
येते रमाईचं नाव..!! १!!

अहो माझ्या गाण्या वरती
सगळ्यानी डान्सं करावं ..!! धु !!

पुत्र जन्मावा भिमा सारखा
अवघ्या देशात करावं नाव
डिजे च्या तालावर ती
का, तरुंनानी डान्स करावं!! २!!

बुद्धी त्यांची होती लवंगी
पुस्तकात रमले राव
शब्दा शब्दाचा अर्थ समजून
संविधान लिहिले राव!! ३!!

माझ्या देशाचं संविधान
त्यात जन माणसाचं आहे हित
रत्न शोभतोय भारताचा
बाबासाहेब आंबेडकर..!! ४!!

तरुणांनो जागरुक व्हावं
करावं आई बापाचं नाव
का, दारू पिऊन तुम्ही
तुमचं आयुष्य वाया घालवावं

भीमाचा आदर्श घ्यारे
चटणी वर नव्हतं तेल
आज सगळं मिळतय तुम्हाला
हा तर वडील धाडयांचा उपकार.!! ५!!



# महामानव

सौ हर्षदा दयानंद गुळमिरे (सोलापुर - ९६५७३३२०१०)

क्रांतीसुर्य होऊनी महामानवा
दलितांचे आयुष्य फुलविले
अंधार वाटेवरती प्रकाश होऊनी
काळोख जीवनातील सारीले....१



विश्वरत्न डाँ बाबासाहेब
महामानव दुत परमशांतीचे
प्रचारक तुम्ही समतेचे
भारतरत्न होते देशाचे....... २

झाले मसुदा समिती अध्यक्ष
बंड केले मानवतासाठी
सुचना स्विकारल्या जनतेच्या
मेहनत कष्ट झटले देशासाठी... ३

विश्वकर्मा भिमा भारतरत्ना
अमर तुझी स्फुर्तीची गाथा
करु वंदन महामानवाला
आदराने नतमस्तक माथा.... ४

भेदभाव गुलामगिरी गाडुनी
फुलविले आयुष्य सकलांचे
क्रांतीदुत महामानवा तुम्ही
अभिवादन स्विकारावे लेकराचे..५



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**भरत शेषेराव कांबळे (लातूर - ९९२३४८५३०८.)**

शिक्षण, ग्रंथ, देशप्रेमी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
विद्वतेने ठरले महान
सन्मान होतोय जगभर

समाज सुधारणा नि राष्ट्र उभारणीसाठी
दररोज अठरा तास अभ्यास करायचे
कैक रात्री जागून काढल्या
अनेकदा उपाशीच रहायचे

दोन वर्षे,अकरा महिने,अठरा दिवसात
संविधान लिहून पूर्ण केले
देशातील सर्व बहुजनांचे
जीवनच बदलून गेले

युगानूयुगे पंच्याऐंशी टक्के बहुजनांची
होती खूप दयनीय अवस्था
मात्र बाबासाहेबांच्या लेखणीने
निर्माण केली मानवतावादी व्यवस्था

शेतकरी,कामगार,महिलांसाठी
केलेल्या कार्याला जोड नाही
परमपुज्य,भारतरत्न,विश्वरत्नाची
प्रतिमा सर्वांच्या हृदयात राही ...



# संविधान

सौ सुवर्णा रमेश तेली (सोलापूर - ७३५०७६७९९९)

जीवणाचं केलं रान
गाऊ त्यांचं गुणगान
शब्द बोले संविधान
माणसाला जीवदान..१

हिनवले जरी त्यांनी
 जाता हीरीच्या पाण्याला
बोल लावला जीवाला
होता साहेब धीराला :२

सात समुद्र पल्याड
जीवनाचं शिकू सार
शिक्षणाची धरी आस
समतेच वाहे वार..३

लेखणीचं झालं सोन
शब्दातून सोडी बाण
विचारांच संविधान
खरं मानाच हे स्थान...४

साऱ्या लेकरांचा देव
असा होता भिमराव
आहे माझ्या हृदयात
ठेवू मनी सदभाव...५



# आपल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेबांची जयंती !

**शब्दश्री विलास देवळेकर**

नव्हते धन
पण साठवले ज्ञान
दिले सर्वांस सम प्रकाश
अशा ज्ञान सुर्याची १३२वी जयंती !! १ !!

होई नैसर्गिक पाण्याचे भेदभाव
खुले केले चवदार तळे
सर्वांस केले धरणाचे नियोजन
अशा महामानवाची १३२वी जयंती !! २ !!

होत असे महिलांचा अपमान
दिले सर्व क्षेत्रात पदाधिकार
आता होई महिलांच्या कर्तृत्वाला सलाम
अशा समानतावादी विचारांची १३२वी जयंती !! ३ !!

कामगारांस होई खच्चीकरण
दिले तासांचे पगार- बोनस- रजेचे देणं
केले प्रगतीचे मार्ग मोकळे
अशा नवं राष्ट्र निर्मात्यांची १३२वी जयंती !! ४ !!

बौद्ध धर्म स्वीकारे
मोडले मुहूर्त- तोडले अधुगती
संविधानातून दिले प्रत्येकास मताधिकार
अशा राज्यघटना शिल्पकाराची १३२वी जयंती !! ५ !!



# युद्ध नको बुद्ध हवा

**प्रतिभा तू खसाळे (यवतमाळ - ७३८७७९५९३३)**

जगाला देऊनी संदेश शांततेचा
तथागत बुद्ध आपण झाला

समजले जीवनाचे मर्म
त्यागला  राजवैभव सर्व

महाणतेचा  उच्चांक गाठला
आदर्श सर्वजगापुढे ठरला

ध्यानाला निवडिले झाड पिंपळाचे
पिंपळ ही अजरा अमर ठरले

सोडूनि प्रपंचाची वाट
धरली अहिंचेची कास

विज्ञानाचा करुनी अंगीकर
अंधश्रद्धेचा केला धिक्कार

प्रज्ञा शील करुणा क्षमा शांती
शिकवण सर्व जगाला दिली

गरज आहे बुद्ध विचाराची
युद्ध नको बुद्ध हवा मागणी प्रजेची



# संवेदना संविधानाच्या

सुमती टापसे (नाशिक रोड - ९४२०६९३५५७)

दाखविला जगण्याचा रस्ता आम्हा
त्यासाठी खाल्लया तुम्ही खस्ता
आंधारात उजेड दिला आम्हा
शत शत प्रणाम बाबासाहेब तुम्हासनी

धुक्याच्या सर्व दिशा होत्या
आले तुम्ही ज्योती बनून
भटकणाऱ्या रस्त्याला आवाज दिला तुम्ही
शत शत प्रणाम बाबासाहेब तुम्हासनी

शब्द माझे साधे सरळ पण
हृदयात संविधानाची गुंज
ज्याचा उपहार दिला आम्हास
शत शत प्रणाम बाबासाहेब तुम्हासनी

दिले शस्त्र घटनेचे हाती
वसंत ऋतूची प्रतीक्षा संपली
धिरजाने विवेकाचा मार्ग दाविला
शत शत प्रणाम बाबासाहेब तुम्हासनी

घडल्या आज सावित्रीच्या लेकी
थांबली घुसमट मनाची
कलमांची महंती कळली
शत शत प्रणाम बाबासाहेब तुम्हासनी



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**सौ. तेजस्विनी नितीन लोखंडे (अमरावती - ९८६०३०२२४२)**

वीरपुरुष हा इथे जन्मला
अस्पृश्यता निवारण्या सिद्ध जाहला,
ज्याचे महू गावात घर
धन्य ते भीमराव आंबेडकर.

चौदा तारखेला जन्म जाहला
चौदावे रत्न मातपित्याला,
ज्याने उजळून टाकले घर
धन्य ते भीमराव आंबेडकर.

करून गरिबीवर मात
केले अन्यायाशी दोन हात,
लेखणीच्या भरवशावर
धन्य ते भीमराव आंबेडकर.

थोर विचारवंत हा असा
अर्थशास्त्र ज्याचा विषय खासा,
झगडला मानवाधिकारावर
धन्य ते भीमराव आंबेडकर.

बहुजन हिताय,बहुजन सुखाय
विचार ज्यांचे थोर,
बौद्धधर्माचा स्वीकार केला,ज्यांनी दीक्षाभूमीवर
धन्य ते भीमराव आंबेडकर.



# भिमाच्या पेनाची शाही बनली रमाई

**सौ. प्रतिभा घनश्याम कळंब (अकोला)**

ज्योत न्यायाची लावली
भीम दलितांचा कैवारी
केला संसार रमाने
ठिगळ लावून भरजरी

पिऊन वाघिणीचं दूध
भिमाने गाजवली कचेरी
बाबासाहेबांच्या यशाची
रमा बनली पायरी

होता बुद्धीत खजिना
महामानव म्हणवला
झाला न्यायाचा देवता
त्याने अन्याय संपवला

कोट घालून अंगातं
भीमा जगाला अभ्यासी
होतं कुंकवाचं ऋण
रमा जागली उपाशी

घास न्यायाचा देण्यास
वाटा तुडवल्या पायी
वारसा घटनेत दिला
दिशा झुकविल्या दाही



# आधार

**वैशाली जगताप बोरसे (धुळे - ९३७०२६६५०२)**

दीन दुबळ्या कैवारी
दिला जीवन आधार
उपकार बा भीमाचे
योग्य वळण आकार ...१

भीम लेखणीची धार
इतिहास घडविला
संविधान लिहुनीया
तुरा मानाचा रोविला ....२

घटनेचे शिल्पकार
दुःख जगीचे जाणले
वाचा अन्याय फोडून
बौध्द तत्व स्वीकारले ...३

समाजाचा उध्दारक
बीजं शिक्षण रुजली
हाती मशाल क्रांतीची
वाट न्याय दाखवली ....४

मनुस्मृती कर्मकांड
झुगारून नवा ध्यास
विचारांना योग्य दिशा
दिला जगण्याला श्वास ....५



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**सौ.अंजली माधव देशपांडे (नाशिक)**

ज्यांच्या मुळे मिळाले भारताला संविधान
अशा थोर पुरुषाला
माझा कोटी कोटी प्रणाम..।।धृ।।

सर्वांना अपुल्या बरोबर घेऊनी
सर्वांना अपला अधिकार देऊनी
ज्यांनी नवा भारत रचला
ते दलितांचे शिल्पकार..।।१।।

स्पृश अस्पृशाचा भेद मिटवला
मंदिरात सर्वांना प्रवेश दिधला
पाण्याला पण शिवु न देणारे
त्यांना चांगला धडा शिकवला..।।२।।

दिन दलितांच्या उध्दारासाठी
यांनी जीवन केले अर्पण
चंदनासमान देह झिजवुनी
लोकांना दाखवला दर्पण..।।३।।



# महामानवाची गौरव गाथा

**जयद्रथ आत्माराम आखाडे (पुणे - ८८८८७४७७१५)**

प्रज्ञासूर्य डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी
केला अभ्यास अर्थशास्त्र, समाजशास्त्राचा
जाणली परप्रांतातील एकता समानता
देशात केला उदय,समाज परिवर्तनाचा....१

दलित चळवळीला दिली इथे प्रेरणा
नष्ट करण्यासाठी सामाजिक भेदभाव
माणसाला माणसासारखे जगू द्यावे
जगात नाही कुठेच,असा भेदभाव...२

दिले सर्वांना मूलभूत हक्क, अधिकार
राजकीय क्षेत्रात, एक व्यक्ती एक मत
रुपांतरीत केले न्यायिक,आर्थिक धोरण
एक मुल्य,एकच किंमत, श्रेष्ठ सिध्दांत....३

लिहिले स्वतंत्र भारताचे पहिले संविधान
सर्व जातीधर्माला, सार्वभौम अधिकार
स्त्री पुरुष समानता आणि दिले संरक्षण
सांविधानिक तत्वांचा, करा अंगिकार....४

न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता प्रस्थापित
प्रत्येक नागरिकाला दिला आत्मसन्मान
नष्ट झाली विषमता, मानसिक गुलामगिरी
दिले सामर्थ्य, अस्मिता आणि स्वाभिमान...५



# माझा भिमराय

## गीता संदिपान शिंदे पाटील (धाराशिव)

अज्ञानाच्या अंधकारात
विद्वत्तेचा हिरा चमकला
अन्यायी प्रथेविरोधी तू
समतेचा लढा उभारला..।।१।।

माणसाला माणूस बनण्याचा
अधिकार तू दिधला
भिमा तुझ्या राज्यघटनेने
नवा इतिहास घडवला..।।२।।

दिनदुबळ्या उपेक्षितांचा
केलास तुच उद्धार
तुझ्या रुपात मिळाला
त्यांना मायेचा आधार..।।३।।

स्त्रियांना तुझ्यामुळे मिळाला
कायद्याने सर्व अधिकार
कधी नाही मी विसरणार
भिमा तुझे हे उपकार..।।४।।

शिका, संघटित व्हा, संघर्ष करा
मंत्र दिला हा महान
धर्मनिरपेक्ष संविधानाचा
सार्थ आम्हा अभिमान..।।५।।



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## प्रदीप कोहपरे (चंद्रपूर - ९८६०८०३१९१)

दलितांची तलवार होऊन गेले--
अन्यायाविरुद्ध प्रहार होऊन गेले--
होते एक गरीबच
पण या जगाचे' कोहिनुर ' होऊन गेले--
वर्गाच्या बाहेर बसून सुद्धा
भारताचे संविधान लिहून गेले---!!
ज्यांच्यामुळे लाखो घरांचा
उद्धार झाला----
दीन दुबळ्यांना जगण्याचा
अधिकार मिळाला--
कोटी-कोटी अभिवादन त्या
महामानवाला---
ज्यांनी संविधानरुपी समतेचा अधिकार दिला!!
फुलांची कहाणी वसंताने लिहिली---
रात्रीची कहाणी ताऱ्यांनी लिहिली--
आम्ही नाही कोणाचे गुलाम
कारण आमच्या आयुष्याची कहाणी
डॉ. बाबासाहेबांनी लिहिली!!
नमन त्या पराक्रमाला ---
नमन त्या देशप्रेमाला
नमन त्या ज्ञानदेवतेला---
नमन त्या महापुरुषाला
डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना!!
मान वर करून जगायला शिकविले
अन्यायाविरुद्ध लढायला शिकवले
शिक्षणाचे महत्व समाजाला समजावले
अशा महामानवास
शत-शत नमन!!



# घटना शिल्पकार

सौ. अनुराधा अनिल पाठक (पुणे - ९८९०८७६९४५)

आंबेग्रामी प्रकाशला
प्रज्ञासूर्य भारताचा।।
तुझ्यामुळे रे लाभला
मंत्र मानव धर्माचा ।।१।।

हृदयात स्थिरावली
भीमराया तुझी मूर्ती।।
चहू दिशांना गाजली
तुझ्या वाचनाची कीर्ती ।।२।।

निश्चयाचा महामेरू
ज्ञान कुंभाचा सागरु।।
दीन दलितांच्या मनी
प्रेम मायेचा आगरु ।।३।।

विश्वरत्न भीमराव
घटनेचे शिल्पकार।।
खुले केले अस्पृश्यां
महाडचे चवदार ।।४।।

कोणी नसावे अडाणी
व्हावे सर्वांचे कल्याण।।
न्याय मिळण्या सर्वांना
लिहिलेस संविधान ।।५।।



# भीमा तुझे योगदान

**अशोक मांदाडे (गडचिरोली - ९७६४६४५४७५)**

तव कार्याचा विसर
नाही पडणार मजं,
राष्ट्र उभारणीसाठी
पेन चाले तुझी रोज

सामाजिक क्रांतीसुर्य
होते अंधारात गेले,
त्यांचे विचार प्रसार
तुम्ही प्रकाशित केले

जागे कराया स्त्रियांस
हिंदू कोड बिल दिले,
चवदार सत्याग्रह
जातीभेद नष्ट केले

प्रज्ञासुर्य ज्ञानतेज
तुझे महा योगदान,
देश चालविण्यासाठी
आम्हा दिले संविधान

जगी तुझी अशी ख्याती
ज्ञान चौरस नायक,
देशासाठी योगदान
भीम माझा असा एक



# साऱ्या जगात आहे थोरं

मंजूताई राजेजाधव (बुलढाणा - ९०२१५२५९२१)

भिमाई माता रामजी पिता
त्यांचं बाई हे पोरं
साऱ्या जगात आहे थोरं
ते भिमराव आंबेडकरं - धृ.

अवमान जाहले भारी
सारे आघात घेऊनी उरी
पोसूनी जिद्द जिव्हारी
विद्येचे झाले पुजारी !!
शिकण्यासाठी धावून गेले
साता समुद्रापारं..... - १-

त्यांच्या पुढती जोडून हातं
करू संकटावरी मातंग
त्यांची शिकवण समजून घेवून
पेरू साऱ्या जनामनातं !!
बुध्दीची धरूनी कास
होऊ त्यांचे वारसदार..... -२-

जातीत जन्मलो ज्या मी
मरणार त्यात मी नाही
घेवून शपथ जगताला
जणू दिली क्रांतीची ग्वाही !!
मंजू सांगे चला चला
बुध्दाच्या वाटेवरं..... -३-



# महामानव

दर्शन जोशी (संगमनेर)

पृथ्वीवरती वाढले जणू,
अंधश्रद्धेचे प्रबल दानव
निवारण त्याचे करायला,
सरसावला तो महामानव !

धम्मचक्र गतिमान जाहले,
सर्वत्र केवळ शांती आली.
परिवर्तनाचे पर्व आले,
भारतामध्ये क्रांती झाली !

काय मिळवले आजवरी ते,
केलेल्या त्या युद्धाने ?
प्रगत झाला भारत अवघा,
केवळ एका बुद्धाने !

किमया होती सत्याची,
भीमरायांनी ती ओळखली
बुद्ध धम्माची निळी पताका,
विश्वामध्ये फडकत गेली !

बुद्ध धम्माच्या वेलीवरती
करुणेचे कोमलसे मृदू दव
पुन्हा एकदा भूमीवरती
यावा यावा तो महामानव !



# संदेश

प्रल्हाद वि. घोरबांड गुरुजी (नांदेड ९०११३५२०६१)

जागवले जगाला
धडा देऊन मानवतेचा
धम्मपरिवर्तन हा
संदेश आहे समतेचा

मी प्रथम भारतीय
अंतिमही भारतीयच आहे
बाबासाहेबांचे धम्मपरिवर्तन
सुध्दा देशहितच आहे

अन्यायाशी लढा
शिक्षणातून संघर्ष
स्वातंत्र्य समता बंधुता
होईल मानवी उत्कर्ष

माणसा माणसा
तू माणसाप्रमाणे वाग
सांगुन गेले डॉ.भीमराव
आता तरी जाग



# बाबासाहेबामुळे

दीपककुमार सरदार (बुलढाणा - ९६६५७८११४२)

वंचितांना दिला । समानता हक्क
झाले सर्व थक्क । कार्यामुळे ।।१

शिक्षण नोकरी । आरक्षण मिळे
सर्वांना ते कळे । बाबामुळे ।।२ ।।

लढा समतेचा । पाण्यासाठी दिला
खुला तो केला । सर्वासाठी ।।३ ।।

सोळा तास काम । मजुरांचे हाल
झाले बाबा लाल । पाहुनिया ।।४

वाघिणीचे दुध । आहे ते शिक्षण।।
करूया प्राशन । सर्वजन ।।५ ।।

गरीबांना दिले । सर्व अधिकार ।
केला प्रतिकार । अन्यायाचा ।।६

राष्ट्र संविधान । केले ते निर्माण
ठेवा त्यांची जाण । प्रत्येकांनी ।।७



# भिम झाला माझा विश्वरत्न

माणिकराव विठ्ठलराव गोडसे (नाशिक - ९८२२८७४४४८)

भिम झाला माझा विश्वरत्न
डॉ बाबासाहेब आंबेडकर
केला उध्दार बहुजनांचा
कोटी कोटी नतमस्तक कर..१

स्पर्श वंचित होताच
पाणी, देव बाटणार
केला मंदिर प्रवेश
झाले तळे चवदार..२

गेला खराटा, मडकं
होता शाप विटाळाचा
मुक्ती कोंडवाड्यातून
श्वास मिळाला हक्काचा..३

ताठ मानाने जगत
कुठे नव्हते झुकले
गेले शरण बुद्धाला
नाही स्वतःला विकले..४

दिली भिम ज्योत हाती
तिला तेवत ठेवूया
निळा झेंडा हाती घेत
आज एकी दाखवूया..५





## प्रज्ञा सूर्य मानवतेचा

प्रा. डॉ. मीना वसंतराव सुर्वे (सांगली - ९५११७७१०९२)

माणसाला माणूस म्हणून
जगण्याचा अधिकार देण्यासाठी
कष्टले हात तयांचे
दीन दलीत अन दुबळ्यांसाठी
बहिष्कृतांना हिम्मत दिली
खाण्या सन्मानाची रोटी
प्रज्ञा सूर्य मानवतेचा
जन्मला माता भिमाईच्या पोटी..१



समता अन एकात्मतेचे धडे
डॉक्टर बाबासाहेबांनी दिले चोहीकडे
मूकनायक व बहिष्कृत भारत
यांचे ते करते बनले
दिन दुबळ्यांसाठी त्यांनी
व्यासपीठाचे जाळे विणले
हुंकार फोडला त्यांनी
मूकनायकांच्या ओठी
प्रज्ञा सूर्य मानवतेचा
जन्मला माता भिमाईच्या पोटी..२

चवदार तळ्यावर सत्याग्रह करूनी
काळाराम मंदिर टाकले खोलूंनी
एक मानवता धर्म जपा साऱ्यांनी
डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर गेले बोलूनी
कुशाग्र अन कुशल बुद्धी
होती त्यांची कीर्ती मोठी
प्रज्ञा सूर्य मानवतेचा
जन्मला माता भिमाईच्या पोटी..३

मायभूमीने गौरवले त्यांना
भारतरत्न म्हणून
जातीपातीची मुळे
काढली त्यांनी खणूनी
संविधानातून मायबापांना टाकले उद्धारुणी
महामानवास या माझे प्रणाम कोटी कोटी
प्रज्ञा सूर्य मानवतेचा
जन्मला माता भिमाईच्या पोटी..४



# कैवारी बहुजनांचे

पिएसआय विनोद बी.सोनवणे लंघाणेकर (अमळनेर - ८८३०७३९८८७)

कैवारी बहुजनांचे तुम्ही
गोर गरीबांचे माय बाप..
संविधानातून दिला आधार
आमच्या पाठीवर तूमची थाप...!!

प्रज्ञासूर्य लखलखीत
भिमराव अमर झाले...
आभिमान आम्हास सार्थक
जगास भिमारूपी देव भेटले...!!

ज्ञानाचा अंथाग महासागर
बाहेर देश्यात डंखा गाजला
शिक्षण इंग्लंड च्या धर्तीवर घेत
जगी बॅरिस्टर म्हणून ध्यानास आला...!!

देश्याला संविधान देऊन
नाव लौकिक झाले...!!
कायद्या पुढे राक्षस
बघा कसे ठार मेले...!!

संघटित होण्याची शिकवण
आपल्या पुण्याईने मिळाली....
अधिकार मिळता हक्काचे
लुटेरूंची तगारी फारच जळाली..!!

आपण सूर्या समान
तेज प्रताप महान वंदनीय...
संविधानाचे जनक तूम्ही
जगी बॅरिस्टर डॉ.बाबासाहेब शोभनीय...!!



# आम्ही

**रजनी निकाळजे (मुंबई - ८३०८६९१३२१)**

तू दिलेले वारसा जोपासतो आम्ही
बुद्ध धम्माच्या पथावर चालतो आम्ही

मूक होत्या अंतरीच्या भावना साऱ्या
धैर्य देतो कायदा अन बोलतो आम्ही....

सोसला अंधार होता जीवनामध्ये
भीम तेजाने पुन्हा तेजाळतो आम्ही.....

राहण्यासाठी जरीही झोपडी आहे
शिक्षणाचे छानसे घर बांधतो आम्ही ....

छत्र छाया लाभली होती तुझी बाबा
सावली मध्ये तुझ्या बघ वाढतो आम्ही...

तूच आहे श्वास अमुचा ध्यास आहे तू
आमच्या साठीच झिजला जाणतो आम्ही...

तू सुगंधी अत्तराच्या सारखा आहे
अत्तरामध्ये तुझ्या गंधाळतो आम्ही .....



# भारतरत्न -घटनेचे शिल्पकार

## सौ. राजश्री वाणी मराठे (पुणे)

१४ एप्रिल १८९१ साली जन्मले क्रांतिसूर्य
पिता रामजी व माता भीमाबाईच्या पोटी
धन्य झाला समाज घडविली समाज क्रांती
तेजस्वी सूर्याचे नाव आजही प्रत्येकाच्या ओठी.....

भारतरत्न आंबेडकरांनी रचिला पाया
सर्वधर्म समभाव समाजात रुजविला
गरिबी श्रीमंती भेदभाव नष्ट करविला
लोकशाही हा आदर्श जगास दाविला....

दीन दुबळ्यांचे एकमेव बाबा आधार
बाबा तुम्हीच बनले घटनेचे शिल्पकार
सर्वांनाच दिला जगण्याचा जीवनात मान
करुनी सकलांचे कल्याण केला अद्भुत अविष्कार...

बहुजनांसाठी शिक्षणाचा कावड खुला केला
आचार विचार उंचावून समाजाचा मान वाढविला
शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा
हा अमूल्य गुरुमंत्र सर्व समाजाला बाबांनी दिला....

नित्य घेतला ध्यास केला सखोल अभ्यास
लेखणीच्या धारीने केला कायद्याला सलाम
साकारुनी राज्यघटना केले सर्वांना सज्ञान
अश्या महामानवास माझा कोटी कोटी प्रणाम



# तेजसूर्य चमकला

कु. सचिन शंकर पाटील (रायगड - ९२०९५७९३३५

तेजसूर्य चमकला नभी
प्रगतीची पहाट झाली
बाबासाहेब तुमच्यामुळे
शैक्षणिक प्रेरणा मिळाली

शिक्षण संघटन संघर्षाचा
मंत्र भावी जीवनाचा आधार
नागरिकत्व मिळाले आम्हा
दूर झाला अज्ञानाचा भार

दिले उल्लेखनीय योगदान
बाबासाहेब, शिक्षणक्षेत्रात
महिलांना सन्मानप्राप्ती
नवी जिद्द दिसली नेत्रात

व्हावा व्यक्तिमत्त्व विकास
मूल्यशिक्षणाला प्राधान्य
समाजप्रबोधन होण्यासाठी
स्वातंत्र्य समता सर्वमान्य

अभ्यासपूर्ण अवलोकन
रचले भारतीय संविधान
सामाजिक क्रांती परिवर्तन
शिक्षणाने दिले आत्मभान



# भारतीय संविधान

**श्री. देविदास नागोरावजी हनवते (नागपूर - ९८६०११०३०४)**

रात दिवस कष्ट सोसूनी
बाबांनी लिहीले संविधान
भारताच्या लोकशाहीसाठी
बाबासाहेबांनी केले दान. ।।१।।

संविधान जनहितासाठी
कायद्याची एक गाठ आहे
समता, स्वातंत्र्य, बंधुत्वाचा
भरलेला शील माठ आहे. ।।२।।

प्रज्ञावान शील करुणेचे
नियम पाळावे जीवनांत
त्या संविधानाच्या हृदयाशी
जीवन जगावे नियमात. ।।३।।

भिमाच्या संविधानामुळेच
भारताची मान ताठ आहे
सर्व बहुजन समाजाची
जगण्याची छान वाट आहे. ।।४।।

सदा पिढ्यानी पिढ्या राहील
बा चे अनमोल संविधान
कायदे पंडीत भिमजीचे
आहे भारताला योगदान. ।।५।।



# विश्वरत्न

धर्मेंद्र जी. कन्नाके (चंद्रपूर - ९४०५७१३२७९)

विजय भसारकर (चंद्रपूर - ८०५५०५८१९५ )

हे महामानवा, हे महामानवा
दिला तू आम्हाला, मार्ग एक नवा
खुल्या नभी विहरतो, हा मुक्त पारवा.||धृ||

हक्क, न्यायासाठी
केला समाज एकसंघ
ज्ञानतेजाने जिंकले
विषमतेचे रणकंद
ब्रीद संघर्षाचे घेऊन, निघाला हा कारवा.||१||

तूच झाला माय
तूच झाला अमुचा बाप
स्वतःच्या मुलांसाठी
करित बदला ना विलाप
मिळे तुझीच ऊब अम्हा,तुझाच गारवा.||२||

सक्तीचे मोफत शिक्षण
घटनेने खुले केले
या मूकभारताला
तू प्रबुद्धाकडे नेले
स्वातंत्र, समता,बंधुतेचा, चाखतो गोडवा.||३||



# भिम -क्रांती....

**अभिजीत केशवराव ठमके (चंद्रपूर - ८४५९७६३७६५)**

भिम पेटला पाहिजे , रक्तात तूझ्या गड्या ,
भिम शोधला पाहिजे , समतेच्या पुस्तकात गड्या..

भिम स्वार्थाचा नाही , सन्मान आहे गड्या
भिम चळवळीत पाहिजे , विक्रीत नाही गड्या..

सोड बाण हातून , सोड त्या तलवारी,
तूझ्या लेखणीच्या शाईत , भिम दिसू देरे गड्या..

दार तूझे ते सोन्याचे , अरे गरज नाही काही ,
तूझी खोल ही कवाडे , निळा ध्वज घेरे गड्या..

व्यवस्थेशी लढणारा , क्रांतिकारी होरे आता ,
आंबेडकर नावाचा , डोंगर उचलं तूरे गड्या..



# सारथी मी होणार आहे...

**अभिजीत केशवराव  ठमके (चंद्रपूर - ८४५९७६३७६५)**

मी भिम वेचतो आहे ,  मी भिम जगतो आहे ,
बलिदानाच्या हर कणांचा , मी अंश बनतो आहे..

माणसा माणसातली भेद करणारी , संस्कृती तू लाथाडलीस
भिमराया
माणूस माणसाला जोडण्याचे , धाडस मी करतो आहे..

समाज परिवर्तनाचे शस्त्र , शिक्षणाच्या व्याख्येत देऊनी
गेलास ,
तूझ्या प्रत्येक  व्याख्येचे स्पष्टीकरण , मी अता करतो आहे.

तू सुर्य , शोषितांचा , पिडीतांचा ,प्रकाश होऊनी गेला
तूझ्या प्रकाश किरणांची , मी ज्योत तेवतं ठेवतो आहे.

बुध्दांचा देऊनी धम्म , समतेचा सुर्य दावीला
तूझ्या समतेच्या रथाचा मी , सारथी होतं आहे..



# बाबा

**सौ. रजनी पोयाम/भादिकर (यवतमाळ - ९४०५७०५२९६)**

भारतीय घटनेचे
तुम्हीच हो शिल्पकार
भार वाहिला झेलून
मनुवाद्यांचे हो वार..//१//

वार तुम्हीही केलेत
पण केली निळी क्रांती
थेंब न वाहे रक्ताचा
मिळवून दिली शांती...//२//

संविधान पराक्रम
करी सज्ञान जनता
दलित, शोषिता न्याय
दिसे  सर्वत्र एकता...//३//

अंधश्रद्धा, बुवाबाजी
यास नसे कुठे थारा
विज्ञानाची कास धरे
वाहे शिक्षणाचा वारा...//४//

विषमता अजूनही
काढतेय  वर डोकं
जातीवाद्यांना गाढण्या
चालवी लेखणी नेकं...//५//

मतदान अधिकार
राष्ट्रीय कर्तव्य छान
स्त्री मुक्त संरक्षण
देशा तुझा अभिमान...//६//



# क्रांतीसुर्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर

मधुकर श्रावण दुफारे (चंद्रपूर - ९९२३६२०७०८)

सार्वभौम भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार
क्रांतीसुर्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर

अखंड वाचनाची ठेऊनीया गती मिळवीली मती
झाला ज्ञानाचा सम्राट मग दिली लेखणीला गती
चमकला सुर्या समान बुध्दीमत्तेने जगभर
क्रांतीसुर्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर

मानवास दिली शिकवणं समृद्धीतून मानवतेची
सांगुन महत्त्व शिक्षणाचे माळ गुंफली समतेची
बौद्ध धम्माला देऊनी थारा घडविला आविष्कार
क्रांतीसुर्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर

माता भगिनींचा कळवळा होता बंधुराज्याला
बनविला त्यांच्यासाठी कायदा दिले स्वरक्षण अस्तीत्वाला
तोडूनिया बंध परंपरेचे दिले समान अधिकार
क्रांतीसुर्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर

थोर तत्वज्ञांनी विज्ञानवादी कृषी पारंगत
तळपती ज्वाला जागृतीची दलित वंचीतांचा छत
भारतरत्न सर्वोच्च पुरस्कार विभूषित विर अमर
क्रांतीसुर्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर



# संविधान

नरेन्द्र गुरुदास कन्नाके (चंद्रपुर - ९८२२४६४५९७)

जगामध्ये आहे हो महान।
भीमरावांनी लिहिले संविधान।।

पारतंत्रातही लढली जनता
धिर दिला तू बहुजनाला
भारतासाठी दिले बलीदान
भीमरावांनी लिहिले संविधान।।

मूकनायक या पाशीकातील
वाचन केले या जनतेनी
तरुणांचे झाले समाधान
भीमरावांनी लिहिले संविधान।।

धर्मनिरपेक्ष-लोकशाही शासन
जात - पात एक समान
स्वराज्यासाठी केले ज्ञानदान
भीमरावांनी लिहिले संविधान।।

राष्ट्राची हीच एकात्मता
आश्वासन देणारी बंधुता
गौतमानी दिले हो वरदान
भीमरावांनी लिहिले संविधान।।

शुद्र लोकांना पाण्यासाठी
सत्याग्रह चवदार तळ्याकाठी
काळाराम मंदिराला  संम्मान
भीमरावांनी लिहिले संविधान।।



# महामानव बाबासाहेब

**श्री कळसे बी.जी अध्यापक (नांदेड - ७४४८२९०७९१)**

आज देशाचे भाग्य उदयाला हो आले
बाबासाहेबा सारखे रत्न जन्मा आले
कुशाग्र बुद्धी आणि हुशार हो महान
विलायती मध्ये जाऊन घेतले शिक्षण
देशासाठी केले कार्य खुप उत्कृष्ट सुंदर
संविधान लीहून केले देशावर उपकार
एकात्मता,समता सर्वांसाठी हे कायदा
सर्व देशवासीयांचा झाला खुप फायदा
तुमचे संविधान म्हणजे देशाची शान
दिन, दलितांचे तुम्ही केले हो कल्यान
तुमची अलौकिक बुद्धी किती भारी
संविधाने मारली उंच विकास भरारी
तुम्ही दिन दलितांचे,कैवारी व बाप
भल्या भल्याना दाखवला तूम्ही प्रताप
भारतातचे संविधान जगात आहे भारी
बाबासाहेब जग सारे  हे कौतूक करी
देशाचे कायदा मंत्री हा तुमचा बहुमान
जयंती निमित्त तुम्हा कोटी कोटी वंदन



# महामानव

डॉ. प्रवीण सुखदेव किलनाके (गडचिरोली - ९४२२१५४११५)

हे महामानवा , तू आमच्या  जीवनात आला नसता
तर आमचं काय झालं असतं
याची कल्पनाच करवत नाही बघ!
जंगलात,कडे-कपारीत, गावकुसाबाहेर राहणारे आम्ही मुख्य प्रवाहात
कधी आलो असतो का रे ?
ना शिक्षणाची दारे खुली झाली असती
ना नोकरीत आरक्षण मिळालं असतं
ना ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या असत्या
ना पोटापाण्याची सोय झाली असती
नदीचं मूळ आणि ऋषीचं कुळ शोधू नये म्हणतात
पण तुझं कुळ तुझ्या मुळावरच उठलं बघ!
तुझा ज्ञानाचा अधिकार खाजगीत मान्य असूनही
अगणित ऋषींना गुरुतुल्य असणाऱ्या तुला
आम्ही वाळीत टाकलं
याला आमचा सामुहिक कपाळ करंटेपणा   नाहीतर आणखी काय म्हणू ?
तू  जाळलेली मनुस्मृती अजूनही
सत्ताधाऱ्यांच्या मनात डोके वर काढतेय
हिंस्त्र श्वापदे संविधानाचे लचके तोडायला निघालीत
तुझी भिमसेना गटागटात  विभागली गेलीय
काही कुत्री आपल्या समोर टाकलेले
हाडूक चघळत लाळघोटेपणा करत आहेत
अशावेळेस मी काय करू?हे प्रज्ञासूर्या तूच सांग!!
योग्य काय ते समजून घ्यायला तुझ्या शतांश तरी बुद्धी दे
आणि लढण्यासाठी हे भिमराया तुझ्या अंगची ताकद दे !!



# विश्वरत्न

## सौ. सुचिता गोपाल कुनघटकर (नागपूर)

चौदा एप्रिल जन्म महामानवाचा
जगी सुर्य झळकला
भारतरत्न संबोधित
खरा विश्वरत्न जहाला
मानवाच्या कल्याणासाठी
कष्ट बहु सोसलेत
भारतीय संविधान लिहुनी
गोरगरीबा तारलेस
अंधाराचा करुनी अंत
तेजसूर्य चमकला
अज्ञानाचा करुनी विमोड
भिम ज्ञानसूर्य झाला
शिका, संघटित व्हा
जनतेस दिला मंत्र
डॉ. बाबासाहेबांनी शिकविले
नवयुगाचे खरे तंत्र
भिमा तुझ्या जन्मामुळे
समानतेचा दर्जा मिळाला
शिक्षणाचे महत्व जाणले
माणुस सुसंस्कृत झाला
समता, स्वातंत्र, बंधुता
सर्वांना मिळे समान न्याय
तोडूनी धर्ममार्तंडाच्या बेड्या
सपंविला मानवा मानवातील अन्याय
कायदेपंडित, अर्थतज्ञ, विचारवंत
घटनेचा तु महाशिल्पकार
ज्ञानसुर्य, प्रज्ञासुर्य, महामानवास
आमचे कोटी कोटी नमस्कार



# उपकार बा भीमा तुझे...!

**भीमानंद मेश्राम (चंद्रपुर - ९४२३६१७८३८)**

सारेच तू दिले बा
न मागताच काही
जगतो स्वाभिमानाने
सारी तुझी पुण्याई...

झालास तूच बाप
झालास तूच आई
थोरवी तुझी गाया
कोषात शब्द नाही...

पोटाला दिलीस भाकर
हातात दिलीस लेखणी
हक्काची दिलीस जाणीव
विचारांची करून पेरणी...

दिलीस तूच वाचा
दीनदलितांच्या मुखी
तुझ्यामुळेच भीमा
झालो रे सारे सुखी...

माझ्या कातडीचे जोडे
घातले जरी तुझ्या पायी
उपकार बा भीमा तुझे
फेडणेच शक्य नाही...



# देणं

उमा किशोर गजभिये (गोंदिया - ९९२१७२७७५७)

भाग्य आमुचें आम्ही आहोत भाग्यवान
दिलं देणं बाबांनी आम्हा मौल्य वान
समाजहितदक्ष, ज्यामुळे मानव कल्याण
असे लाभले देणं भारताचे संविधान !! १ !!

भारतीय संस्कृतीचं अमृततुल्य लेणं
मानव वंशाचा ३९५कलमी ग्रंथ महान
जागतिक दीन -हिनाचे दिले हक्क अधिकार
लोकशाहीचा चैतन्यमयी महिमा
गहन !! २!!

द्यावे दान असे जसे बाबांनी दिले
हिरे, मानके, रत्ने भीमापुढे फिके पडले
स्वतःची मुले देऊन तुम्हाला बलिदान
माणसाला माणुसकीचे स्वाभिमानी जीणें दिले !! ३ !!

अन्याय, अत्याचार, आणि बलात्कार
कायद्याच्या संमतीने केला चमत्कार
समानतेने वागविले नर आणि नार
असे करुणामयी भीमाचे थोर उपकार !! ४ !!

असे देणं संविधानाचं महान तत्वज्ञान
बाबांनी शिकविले आम्ही जीवित की मृतप्राण
लाभले पुण्यकर्म भीमाचे असे भारतीयांची शान
देण्याची किंमत टिकवून ठेऊन
देऊनी प्राण !!५ !!



# भिमा तुमच्यामूळे....

शेषराव जाधव 'शेष' (लोहा - ९९२३०९४३३२)

भिमा तुमच्यामुळे
संविधान घडले
आणि भारत भूमीला
देश चालवणे सोपे झाले

भिमा तुमच्यामुळे
अस्पृश्यता पळाली
अनब ती गुण्यगोविंदाने
नांदू लागली

भिमा तुमच्यामुळे
आम्ही शिकून मोठे झालो
आणि आम्ही आमच्या हक्काचे
धनीधार बनलो

भिमा तुमच्यामुळे
आम्ही जगतो स्वाभिमानाने
आणी मिळवतो सर्व
आमच्या प्रयत्नाने

पण आज भीमा
संविधान रडतो आहे
त्याला कुठेतरी ठेस लागतीय
म्हणून पुकारतो आहे..



# नमन तुम्हाला बाबासाहेब

**सचिन गणपतराव मुळे (परभणी ९७६७३२३३१५)**

विश्वरत्न, ज्ञानसुर्य,भारतरत्न
भारतीय घटनेचे शिल्पकार
राज्य घटना लिहून केले तुम्ही
मानव जातीवर अनंत उपकार

अज्ञान रूपी अंधार दूर केला
शत शत नमन थोर महात्माला
शिक्षणाचे महत्त्व समजावून
माणुसकीचा धडा शिकविला

मानवाचे महामानव ते झाले
दिन दलितांचे झाले ते कैवारी
सहन केला समाजाचा त्रास
त्यांना सुधारण्याची ही तयारी

अभिमानास्पद उंची गाठली
पंडितांना त्यांनी मागे टाकले
स्वबळावर ध्येय ही प्राप्त केले
एक आदर्श व्यक्तिमत्त्व ठरले

त्यांची अमुल्य शिकवण आहे
अपले दुःख हरण्यासाठी येई
कोणी गैरसमज काढून टाका
स्वताःचे अस्तित्व स्वतःनिर्माण होई



# युगपुरुष

## पौर्णिमा सुरज डांगे (चिपळूण)

भीमाई पोटी जन्मले रत्न
कर्तृत्वाने तेजाळले हर क्षेत्र
ज्ञानाचा महासूर्य,अलौकिक
कार्याने दिपले जणू हर नेत्र

अनंत घाव उरी सोसुनी
अन्यायास केला मज्जाव
घडवुनी शैक्षणिक क्रांती
नष्ट केला उच्चनीच भेदभाव

वंचित शोषितांच्या न्यायार्थ
समानतेचे पेरले ज्ञानमोती
भारताची राज्यघटना रचुनी
संविधानाने केली जनजागृती

महामानवाच्या कार्याची थोरवी
वर्णण्यास शब्द अपुरे पडती
आजही डॉ.बाबासाहेब आहेत
भूतलावरील असामान्य विभूती

त्यांच्या सत्कार्याचा परिमळ
आजही दरवळतो आसमंतात
असा युगपुरुष पुन्हा पुन्हा
जन्मावा आपुल्या हिंदुस्थानात



# नतमस्तक

## प्रभावती संदिप वळवले (नांदेड)

हाती घेऊनी लेखणी
ज्यांनी लिहिले सविधान
एक वेळा जेवण नाही
मिळाले त्यांना
चणे फुटाणे खाऊन ज्यानी भरले पोट स्वतःच,,,
हाला हा,, समाजाचा
तिरस्कार ज्यांनी सोशविला,,,
ज्यांनी शिक्षणाचे महत्त्व
समाजाला सांगितलं
ज्यांनी त्यांना कमी समजेल
अठरा अठरा तास अभ्यास
ज्यानी केला
आपल्या शिक्षणाचा व बुद्धिमत्तेचा
उपयोग देशाच्या व
समाजाच्या उद्धारासाठी केला,,,
भारत देशाचे महान सुपुत्र,
सामाजिक
प्रबोधनाचे प्रणेते, जागतिक
कीर्तीचे तत्ववेत्ते, प्रचंड
बुद्धिमत्ता असणारे, समाजासाठी अनेक त्याग करणारे,
दलित समाजाला हक्क
मिळवून देणारे, शेतकऱ्यांचे
कैवारी म्हणून
संविधानाचे लेखक आमचे
बाबासाहेब आंबेडकर
लेखणीची जादू काय हे
त्यांनी दाखवली
सरस्वतीचे वरदान ज्यांना मिळाले
राज्यघटनेचे शिल्पकार
आंबेडकरांपुढे नतमस्तक मी झाले



# भीम माझा

## अनिल शामराव केंगार (वाढेगाव , सांगोला)

महु गाव नगरीत
जन्मा भिमराव आले ,
भिमा रामजीच्या पोटी
एक रत्न ते जाहले!!

वर्गा बाहेर बसून
त्यांनी विद्या मिळविली ,
आम्हां ज्ञानाची कवाडं
भीमानेच खुली केली!!

हिनवले जरी त्यांना
केला जोमाने संघर्ष ,
होऊनिया बॅरिस्टर
भीम जगाचे आदर्श!!

चवदार तळे त्यांनी
खुले केले बहुजना ,
चिंता मिटली पाण्याची
दिले अमृत सर्वांना !!

धन्य धन्य झालो आम्ही
दिले आम्हा संविधान ,
बाबा तुमच्याच मुळे
आहे आम्हा समाधान!!

जनतेच्या मनामंदी
भीमा राहिला अमर
घटनेचा शिल्पकार
दलितांचा तु आधार!!






ISBN No. - 978-93-5969-000-1
काव्यांगण प्रकाशन